# 5.विद्यार्थी लाभाच्या योजना

## • विद्यार्थी लाभाच्या विविध योजना •

**• राष्ट्रीय साक्षरता मिशन (National Literacy Missione)**

**सुरुवातः 5 मे, 1988 रोजी (केंद्रशासनाने)**

**उद्देश : प्रौढ शिक्षणाची तीव्रता वाढविणे व अधिक प्रभावीपणे प्रसार**

**करणे,**

**• निरक्षरता दूर करून 15 ते 35 वर्षे वयोगटातील निरक्षरांना**

**कार्यात्मक साक्षर बनविणे,**

**• 1990 साली संपूर्ण भारतात,**

**संकल्पना :**

**भारतात, 'राष्ट्रीय साक्षरता मिशनच्या' अनुसार जर एखादी व्यक्ती**

**आपले नाव लिहू आणि वाचू शकत असेल तर त्या व्यक्तीला साक्षर समजले जाते.**

**व्याप्ती :**

**सर्वप्रथम केरलमधील कोइयाम शहर व नंतर एर्नाकुलम**

**"बाचन, लेखन व प्राथमिक अंकगणित यांचे कौशल्य प्राप्त करणे**

**व त्याचा दैनंदिन जीवनामध्ये प्रत्यक्ष उपयोग करण्याची क्षमता म्हणजे साक्षरता होय."**

**• खडू-फळा मोहीम**

**सुरुवात : 1987-88 पासून (पूर्णतः केंद्रपुरस्कृत)**

**उद्देश : 1986 साली शैक्षणिक धोरणामध्ये शाळेची इमारत, शैक्षणिक साधनांचा अभाव या कारणांमुळे गळतीच्या प्रमाणात होणारी वाढ रोखण्यासाठी प्राथमिक शाळांना मूलभूत सुविधा पुरविण**

**उद्दिष्टे :**

**1. 30 सप्टेंबर, 1986 या दिवसापर्यंत विविध शासकीय शाळा व संस्थांमध्ये अस्तित्वात असणाऱ्या पायाभूत सोई व मानवी संसाधने यांमध्ये मोठ्या प्रमाणात सकारात्मक बदल घडवून आणणे.**

**2. प्राथमिक शाळांसाठी आवश्यक संस्थात्मक साहित्य, शिक्षण साहित्य (खडू, फळा, नकाशे) इत्यादी वस्तू उपलब्ध करून देणे. स्वरूप :**

**पूर्णत: केंद्रपुरस्कृत**

**भारतातील सर्व प्राथमिक शाळांना किमान महत्त्वाच्या सुविधा पुरविण्याचे लक्ष्य ठरविण्यात आले होते. उदा.,**

**• शिक्षक : एकशिक्षकी शाळांमध्ये, प्रामुख्याने ग्रामीण भागातील**

**साहित्य :**

**दान पक्क्या**

**शिक्षकांसाठी पाठ्यपुस्तके, मार्गदर्शिका इ. अध्यापनोपयोगी साहित्य उदा., नकाशे, पृथ्वी, गोल, तक्ते इ., खेळणी उदा., ठोकळे, चित्र, प्राणीजगत, मोज-पट्ट्या.**

**सर्व शिक्षा अभियान**

**सुरुवात : 2001 पासून 'सर्व शिक्षा अभियान' हा केंद्रशासनाचा फ्लॅगशीप कार्यक्रम असून राज्यांच्या साहाय्याने प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण साध्य करण्यासाठी हा कार्यक्रम कालबद्ध पद्धतीने राबविण्यात येत आहे.**

**उद्देश : प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण निर्धारित कालावधीत प्राप्त करणे.**

**6 ते 14 वर्षे वयोगटातील बालकांना उपयुक्त व योग्य प्राथमिक शिक्षण घेऊन 2010 पर्यंत शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करणे व शिक्षणातील सामाजिक, प्रादेशिक व लैंगिक भेद दूर करणे. उद्दिष्टे :**

1. **6 ते 14 वर्षे वयोगटातील सर्व मुलांना 2005 पर्यंत शिक्षण हमी योजना व पर्यायी शिक्षण योजनांतर्गत शिक्षण देणे.**

**उद्दिष्टे :**

**1. 6 ते 14 वर्षे वयोगटातील सर्व मुलांना 2005 पर्यंत शिक्षण हमी योजना व पर्यायी शिक्षण योजनांतर्गत शिक्षण देणे.**
**2.सन 2007 पर्यंत सर्व बालकांना पाच वर्षांपर्यंतचे प्राथमिक शिक्षण उपलब्ध करून देणे.**
**3. सन 2010 पर्यंत सर्व बालकांना आठ वर्षांपर्यंतचे प्राथमिक शिक्षण उपलब्ध करून देणे.**
**4. गुणवत्ताधिष्ठित प्राथमिक शिक्षणावर भर आणि जीवनोपयोगी शिक्षणाचा अंगीकार करणे.**
**5. सन 2007 पर्यंत प्राथमिक स्तरावरील आणि सामाजिक तफावत व लिंग आधारित भेदभाव दूर करणे.**
**6.सन 2010 पर्यंत विद्यार्थी गळतीला पूर्ण आळा घालणे. 7.ग्रामीण व दुर्गम भागांत नवीन प्राथमिक शाळा सुरू करणे व वस्तीशाळेचे रूपांतर नवीन प्राथमिक शाळेत करणे. 8.शिक्षकांची संख्या अपुऱ्या असलेल्या सध्या अस्तित्वात असलेल्या शाळांमध्ये वाढीव शिक्षकांची तरतूद करणे तसेच सध्याच्या शिक्षकांच्या क्षमतेत सुधारणा करण्यासाठी व्यापक प्रशिक्षण अध्यापन-अध्ययनाची साधने विकसित करण्यासाठी अनुदान आणि तालुका व जिल्हा स्तरांवरील शैक्षणिक आधार संरचनेस बळकटी देणे.**
**9. जीवन कौशल्यांसहित गुणवत्तेचे प्राथमिक शिक्षण उपलब्ध करून देणे.**
**10. शाळेत प्रवेश घेतलेल्या सर्व मुलांना किमान उच्च प्राथमिक शिक्षणापर्यंत शाळेत कायम टिकवून धरणे.**
**11. डिजिटल डिव्हाइड कमी करण्यासाठी संगणक शिक्षणाची तरतूद. 12. प्रत्येक प्राथमिक शाळेत संगणक प्रयोगशाळा निर्माण करणे. सन 2009 मधील शिक्षण हक्क कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व शिक्षा अभियानाची उद्दिष्टे आणखी वाढली.**
**13. प्राथमिक शिक्षणाची गणवत्ता वाढविणे.**

**13. प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता वाढविणे.**
**14. कायद्याच्या अंमलबजावणीच्या पर्यवेक्षणासाठी सुविधा उभारणे. 15. कायद्याच्या प्रसारासाठी राष्ट्रीय प्रसार कार्यक्रमांचे आयोजन करणे.**
**व्याप्ती : देशातील सर्व जिल्ह्यांमध्ये**
**यंत्रणा : हे अभियान-**

1. राज्य सरकारच्या मदतीने सर्व देशात राबविले जाते. 2. प्रत्येक राज्यामध्ये हा कार्यक्रम राबविण्यासाठी एक स्वायत्त राज्यस्तरीय कार्यालयाची निर्मिती.

3. महाराष्ट्रात 'महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद (म.प्रा.शि.प.) या कार्यालयांतर्फे हे अभियान राबविले जाते.

मध्यान्ह भोजन योजना

सुरुवात : 22 नोव्हेंबर, 1995 रोजी

1. सन 1925 मध्ये मद्रास पालिकेतील इंग्रज प्रशासनाने असा कार्यक्रम सुरू केला.

2.सन 1930 मध्ये फ्रेंचांनी पाँडीचेरीमध्ये सुरू केला,

3.सन 1962-63 मध्ये के. कामराज या मुख्यमंत्र्यांनी प्रथम चेन्नईत नंतर सर्व तमिळनाडूत मध्यान्ह भोजन कार्यक्रम सुरू केला. 1984 साली गुजरात हे मध्यान्ह भोजन योजना सुरू करणारे दुसरे राज्य तर 1984 मध्येच सुरू करणारे केरळ तिसरे राज्य ठरले.

1990-91 पर्यंत 12 राज्यांत ही योजना सुरू झाली.

5. नियोजनात 2001 मध्ये समावेश व 2004 मध्ये अंमलबजावणी, भारताने यूनोच्या 'Convention on the right of Child' मधील कलम 24(2) नुसार भारताने मुलांना 'पुरेसा पोषण आहार' पुरविणे मान्य केले.

## योजनेत होत गेलेले बदल :

1. 15 ऑगस्ट 1995 रोजी (National Programme on Nutritional Support to Primery Education (NP- NSPE) या नावाने प्राथमिक शाळेतील मुलांच्या पोषणात वाढ करण्याच्या उद्देशाने केंद्रशासनाने 2,408 गटात ही योजना सुरू केली.

2.सन 1997-98 पासून NP-NSPE योजना संपूर्ण देशभर लागू.

क्र.

घटक

प्राथमिक (वर्ग 1 ते 5) (वर्ग 6 ते 8)

उच्च प्राथमिक

1. कॅलरी

450

700

2.

प्रोटिन (ग्रॅम)
12
20
3.
तांदूळ / गहू (ग्रॅम)
100
150
4.
डाळ (ग्रॅम)
20
30
5.
भाजीपाला (ग्रॅम)
50
75
5.
7.5
6. तेल/स्निग्ध (ग्रॅम)
सुरुवातीस 80% उपस्थिती असणाऱ्या बालकास प्रति महिना 3 कि.ग्रॅ. गहू किंवा तांदूळ देण्याची व्यवस्था होती, परंतु धान्य बालकाऐवजी पूर्ण परिवारासाठी मिळू लागल्याने हेतू साध्य झाला नाही.
4. Right to Food' केसमध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने
28 नोव्हेंबर, 2001 रोजी दिलेल्या निर्देशानुसार शाळांमध्ये आहार शिजवून देण्यास सुरुवात केली.
5. ऑक्टोबर 2007 पासून NP-NSPE हे नाव बदलून National Programme of Mid day या नावाने उच्च प्राथमिक (6 ते 8 इयत्ता) साठी योजना 3,479 शैक्षणिक मागास गटात (EBBS) विस्तारित केली.

उद्देश :
1. पटनोंदणी व उपस्थिती वाढविणे आणि गळतीचे प्रमाण कमी करणे याबरोबरच प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांची पोषणस्थिती सुधारणे. 2. शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत चालविल्या जाणाऱ्या शाळा, शासन अनुदानित, वस्तीशाळा पर्यायी व नावीन्यपूर्ण शैक्षणिक केंद्रे, महात्मा फुले शिक्षण हमी योजना केंद्रे, आश्रमशाळा तसेच अंध व दिव्यांग

मुलांकरिता चालविल्या जाणाऱ्या अनुदानित शाळा यांमधील इयत्ता 1 ली ते 5 वी च्या विद्यार्थ्यांची पोषण स्थिती सुधारणे.
3. गरीब व प्रतिकूल परिस्थितीतील मुलांना शाळेत नियमितपणे येण्यासाठी आणि वर्गातील शैक्षणिक बाबींवर लक्ष केंद्रित करण्यास प्रोत्साहन देणे.
राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान
सुरुवात : मार्च 2009
पार्श्वभूमी: सन 2007 च्या स्वातंत्र्यदिनी पंतप्रधानाच्या घोषणेस अनुसरून,
व्हिजन:
1. रहिवास ठिकाणापासून योग्य अंतरावर माध्यमिक शिक्षण पुरविणे. (उदा., माध्यमिक 5 कि.मी. च्या आत आणि उच्च माध्यमिक 7-10 कि.मी. च्या आत)
2. 2017 पर्यंत / 12 व्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटीपर्यंत माध्यमिक शिक्षणात सार्वत्रिक प्रवेश (Universal Access) साध्य करणे स्थूल पटनोंदणी दर/GER 100% साध्य करणे.)
3. सन 2020 पर्यंत सार्वत्रिक धारणा (Universal Retention) साध्य करणे.
4. आर्थिक कमजोर. शैक्षणिक मागास. ग्रामिण मली व दिव्यांग मले.

उद्दिष्टे :
1. माध्यमिक शिक्षणातील प्रवेश (Access) वाढवून दर्जा सुधारणे. 2.सर्व शाळा ठरविलेल्या दर्जाच्या (Norms) बनविणे.
3.लिंगभावात्मक, सामाजिक व दिव्यांगत्वाचे अडथळे दूर करून सर्वांना प्रवेश मिळवून देणे.
4. माध्यमिक शिक्षणात सन 2017 पर्यंत सार्वत्रिक प्रदेश व सन 2020 पर्यंत सार्वत्रिक धारणा प्राप्त करणे.
सुविधा : योजनेंतर्गत माध्यमिक शाळांना पुरविण्यात येणाऱ्या भौतिक सुविधा
1. अतिरिक्त वर्गखोल्या
2. प्रयोगशाळा
3. कला व हस्तकला गृह
4. पिण्याच्या पाण्याची सुविधा
5. वाचनालय
6. शौचालये

7. दूरस्थ क्षेत्रात शिक्षकांसाठी वसतिगृह
योजनेत पुरविण्यात येणारे महत्त्वाचे दर्जात्मक हस्तक्षेप :
1. विद्यार्थी शिक्षक प्रमाण 30:1 पर्यंत कमी करण्यासाठी अतिरिक्त शिक्षक नियुक्ती
2. विज्ञान, गणित व इंग्रजी शिक्षणावर भर
3. शिक्षकांना सेवांतर्गत शिक्षण
4. विज्ञान प्रयोगशाळा

5. ICT आधारित शिक्षण (ICT information and Communication Technology)
6. अभ्यासक्रमात सुधारणा
कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय
सुरुवात : जुलै / ऑगस्ट 2004, 1 एप्रिल, 2007 पासून ही शिक्षा अभियानाची उपयोजना म्हणून सुरू करण्यात आली.
उद्देश : अनुसूचित जाती, अनु. जमाती, इतर मागासवर्गीय, अल्पसंख्याक समुदायातील मुलींसाठी निवासी उच्च प्राथमिक स्तरावरील वस्तीशाळा सुरू करणे.
लाभार्थी : ग्रामीण महिला साक्षरता 30 टक्क्यांपेक्षा कमी असलेल्या शैक्षणिकदृष्ट्या मागास गट/तालुक्यांमध्ये आणि महिला साक्षरता राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी असलेल्या निवडक शहरी भागात सुरू करण्यात आली.
व्याप्ती : 27 राज्यांमध्ये राबविण्यात येते.
जागा : 75% एस.सी./एस.टी./ओ.बी.सी. अल्पसंख्याकांसाठी 25% - दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांतील मुलींसाठी राखीव आहेत. उद्दिष्टे :
1. विखुरलेल्या वस्त्यांच्या प्रदेशामध्ये डोंगराळ व दाट वन असलेल्या प्रदेशात मुलींना फार दूर जावे लागू नये यासाठी निवासी शाळा स्थापन करणे.
2. लिंगाधारित साक्षरतेमधील दरी ही राष्ट्रीय सरासरीपेक्षा जास्त असलेल्या आणि राष्ट्रीय सरासरीच्या तुलनेत ज्या ग्रामीण
भागातील साक्षरतेची सरासरी कमी असलेल्या ठिकाणी ही योजना राबविणे.
3. पौगंडावस्थेतील मुली, 10 वर्षे वयातील प्राथमिक शिक्षण पूर्ण करू न शकलेल्या मली व भटक्या जमाती कटंबातील मली यांना

3. पौगंडावस्थेतील मुली, 10 वर्षे वयातील प्राथमिक शिक्षण पूर्ण करू न शकलेल्या मुली व भटक्या जमाती कुटुंबातील मुली यांना शिक्षण प्रवाहात आणणे.
4. उच्च प्राथमिक शिक्षणातील लैंगिक विषमता (मागास वर्गातील विषमता) नष्ट करणे.
5. अनु. जाती, जमाती व अल्पसंख्याक गटातील मुलींसाठी उच्च प्राथमिक शिक्षणाची सोय असणारी विद्यालये या योजनेंतर्गत उभारणे.
6. या योजनेंतर्गत शाळा, पायाभूत सुविधा, वसतिगृह उभारण्यापासून कर्मचाऱ्यांचा व शिक्षकांचा पगार दिला जातो.
राष्ट्रीय उच्च स्तर शिक्षा अभियान (RUSA)
सुरुवात : 2013
1.पात्र उच्च शिक्षणासाठीच्या संस्थांना धोरणात्मक दृष्टीने निधी पुरविणे,
2. सर्वसाधारण राज्यांना 65:35 तर विशेष दर्जा असलेल्या राज्यांना 90:10 असा निधी पुरविणे,
3. सदर निधी प्रमाणकांच्या आणि प्रदानांच्या (Out Come) आधारे दिला जाईल,
4. राज्यातील संस्थांची सर्वंकष गुणवत्ता वाढविणे,
5. राज्य विद्यापीठांची स्वायत्तता वाढविणे आणि संस्थांमधील प्रशासनिक सुधारणा करणे.
6. संलग्नता, शैक्षणिक आणि परीक्षाप्रणाली सुधारणा करणे. 7. सर्व उच्च शैक्षणिक संस्थांमधील उच्च दर्जाच्या विद्याशाखा पुरेशा प्रमाणात उपलब्ध असतील याची खात्री देणे तसेच सर्व स्तरांतील रोजगारांची क्षमता वर्धन करणे.
8. उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये संशोधन व नवोन्मेषासाठी

मुलींसाठी अहिल्याबाई होळकर मोफत प्रवास योजना ग्रामीण भागातील मुली शिक्षणापासून वंचित राहू नयेत म्हणून इयत्ता 5 वी ते 12वी पर्यंतच्या मुलींना शाळेत जाण्यासाठी एस.टी. ने मोफत प्रवासाची योजना शासनाने 1997 पासून सुरू केली आहे. या योजनेचा लाभ ज्या गावात माध्यमिक शाळा नाही आणि ज्या विद्यार्थिनींची शाळेत 75% उपस्थिती आहे अशा मुलींना अनुज्ञेय आहे. मुलींनी माध्यमिक शाळेत प्रवेश घेतल्याचा

मुख्याध्यापकाच्य सहीचा दाखला शाळेमार्फत राज्य परिवहन महामंडळाकडे सादर केल्यानंतर, राज्य परिवहन मंडळाकडून मुलींना प्रवासाचा तीन महिन्याचा पास दिला जातो.

सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुली आर्थिक परिस्थितीमुळे शाळा सोडून जाऊ नयेत म्हणून त्यांच्या साहाय्यासाठी ही योजना आहे. या योजनेस अनुसरून जिल्हा स्तरावर विश्वस्त संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत. समाजातील दानशूर व्यक्तींकडून स्वयंस्फूर्त मिळणारा निधी राष्ट्रीयीकृत बँकेत ठेव म्हणून ठेवून त्या मुदत ठेवीतून आलेल्या व्याजातून इयत्ता 8 वी पर्यंतच्या विद्यार्थिनींना शिक्षणासाठी
दरमहा 30 रुपयांची मदत दिली जाते.

राजीव गाधी किशोरवयीन मुलीच्या सशक्ती- करणाची योजना (सबला)

सुरुवात : 19 नोव्हेंबर, 2010 रोजी देशातील 200 जिल्ह्यांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर.

सध्या 205 जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येत आहे. यामध्ये महाराष्ट्रातील 11 जिल्ह्यांचा समावेश आहे.

किशोरशक्ती योजना आणि किशोरवयीन मुलींसाठी राष्ट्रीय कार्यक्रम या दोन योजना एकत्र करून सबला योजना सुरू करण्यात आली आहे.

उद्दिष्टे :

1. किशोरवयीन मुलींना स्वयं विकास आणि सशक्तीकरणासाठी सक्षम करणे.
2. त्यांचे पोषण व आरोग्य स्थिती सुधारणे.

सुकन्या समृद्धी योजना

1. या योजनेनुसार 10 वर्ष किंवा त्यापेक्षा कमी वय असलेल्या मुलींच्या नावाने बँकेत किंवा पोस्ट ऑफिसमध्ये सुकन्या समृद्धी खाते उघडण्यात येते.

सुरुवात : 22 जानेवारी, 2015

बेटी बचाओ बेटी पढाओ योजनेंतर्गत.

खाते ₹1,000 यांच्या ठेवीसहित काढता येते.

प्रत्येक वर्षी किमान ₹1,000 तर कमाल ₹1,50,000 खात्यामध्ये भरता येतील. खाते उघडल्यापासून त्यामध्ये 14 वर्षे पैसे भरता येतील. व्याजदर सरकारमार्फत निश्चित केला जाईल. 2015-16 साठी तो
9.2% इतका होता.

6. खाते उघडल्यापासून 21 वर्ष संपल्यानंतर किंवा त्यापूर्वी मुलीचे लग्न झाल्यास ही योजना संपुष्टात येईल.
7. मुलीचे वय 18 वर्ष पूर्ण झाल्यानंतर खात्यातील 50% रक्कम तिच्या विवाहासाठी किंवा उच्च शिक्षणासाठी काढता येईल.

## एकात्मिक बालविकास प्रकल्प

सुरुवात : 2 ऑक्टोबर, 1975
बालविकासासाठी राबविण्यात येणारी ही जगातील सर्वांत मोठी योजना आहे.
या योजनेचे लाभार्थी : 6 वर्षांखालील बालके, गर्भवती स्त्रिया, स्तनदा माता हे आहेत.
योजनेची उद्दिष्टे :
• 0 ते 6 वयोगटातील मुलांचे पोषण आणि आरोग्य स्थिती सुधारणे. • मुलांच्या योग्य मानसिक, शारीरिक आणि सामाजिक विकासासाठी पाया घालणे.
• मृत्युदर, विकृती, कुपोषण आणि शाळेतील गळतीचे प्रमाण कमी करणे.
• मुलांच्या विकासास चालना देण्यासाठी विविध विभागांमधील धोरणे आणि अंमलबजावणीचा प्रभावी समन्वय साध्य करणे. •योग्य पोषण आणि आरोग्य शिक्षणाद्वारे मुलांच्या सामान्य आरोग्य आणि पौष्टिक गरजा पूर्ण करण्यासाठी मातांची क्षमता वाढविणे. सेवांचा संच : खालील 6 सेवा या योजनेंतर्गत उपलब्ध करून
देण्यात येतात.

(1) पूरक पोषण आहार : बालके, स्तनदा माता, गर्भवती स्त्रिया यांच्या पोषणविषयक किमान गरजा पुरविण्यासाठी पूरक पोषण आहार कार्यक्रम राबविण्यात येतो. यानुसार एका वर्षातून किमान 300 दिवस पूरक पोषण आहार देण्यात येतो.
(2) आरोग्य तपासणी : यामध्ये 6 वर्षांपेक्षा कमी वयाची बालके, स्तनदा माता, गर्भवती स्त्रिया यांची नियमित आरोग्य तपासणी, वजन, प्रतिरक्षण, कुपोषण व्यवस्थापन, डायरिया (अतिसार उपचार) औषधांचे वितरण इत्यादी सेवा पुरविण्यात येतात.
(3) संदर्भित सेवा : आरोग्य तपासणी, वाढीचा आढावा, तत्काळ वैद्यकीय मदतीची गरज असलेल्या आजारी किंवा कुपोषित बालकांना आरोग्य

केंद्राकडे संदर्भित करणे. या सर्व प्रकारची यादी अंगणवाडी सेविका रजिस्टरमध्ये नोंदवून घेतात.
(4) शालेयपूर्व अनौपचारिक शिक्षण: या योजनेंतर्गत अंगण- वाडीमध्ये 3 ते 6 वर्षांच्या बालकांना शालेयपूर्व अनौपचारिक शिक्षण देण्यात येते.
(5) पोषण आणि आरोग्य शिक्षण: पोषण, आरोग्य शिक्षण हे अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे एक प्रमुख अंग आहे. विशेषतः 15 ते 45 वयादरम्यानच्या स्त्रियांच्या दीर्घकालीन क्षमता विकासावर भर देण्यात येतो. जेणेकरून त्यांच्या स्वतःच्या आरोग्याची पोषण व विकासाची गरज तसेच त्यांच्या मुलांची आणि कुटुंबाची काळजी घेऊ शकतील. (6) लसीकरण: यामध्ये गर्भवती महिला, नवजात बालक यांना टाळता येण्याजोग्या रोगांविरुद्ध लसीकरण करण्यात येते. पोलिओ,

लोकसंख्या निकष :
शहरातील प्रकल्पासाठी 1 लाख लोकसंख्येसाठी एक शहरी ICDS प्रकल्प मंजूर केला जातो.
ग्रामीण भागामध्ये वस्त्यांच्या लोकसंख्येनुसार अंगणवाडी केंद्रे स्थापन करण्यात येतात.
सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना
सुरुवात : ही योजना प्राथमिक व माध्यमिक शाळेतील मुलींसाठी 2003 सालापासून राबविली जाते.
उद्देश : प्राथमिक (5 वी ते 7 वी) आणि माध्यमिक (8 वी ते 10 वी) शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जातींतील मुलींच्या गळतीचे प्रमाण कमी करणे आणि आर्थिक साहाय्य उपलब्ध करून देणे. स्वरूप-काळ : या शिष्यवृत्तीचे वितरण वर्षातून तीन वेळा (26 जून, 22 सप्टेंबर आणि 3 जानेवारी) करण्यात येते. प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनीला दरमहा ₹60 तर माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनीला दरमहा ₹ 100 असे एकंदर 10 महिने शिष्यवृत्ती दिली जाते.